जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2018
लोकमत

# ज्ञानासोबत व्यवहार ज्ञानाची सांगड घाला

## डी. टी. शिर्के : शाहू कॉलेज बक्षीस वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विषयाचे ज्ञान, सामान्यज्ञान आणि व्यवहारज्ञान यांची सांगड घातली तर जीवनात विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो. पुस्तकी व अवांतर वाचन विद्यार्थ्याला समृद्ध करते. त्यामुळे नेहमी अभ्यासाबाहेरील वाचन करावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे होते. रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य सरोज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत सहभाग घेऊन आपले व्यक्तिमत्त्व अधिक विकसित करावे. जीवनात आदर्शवत महामानवाच्या विचाराचा व आचाराचा वारसा जपत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष अब्राहम लिंकन, डॉ. सुखात्मे यांचे विचार आत्मसात करावेत.

अध्यक्षीय भाषणात मोरे म्हणाले, महाविद्यालयात येऊन सर्वसाधारण गुणवत्ताप्राप्त केलेला विद्यार्थी सर्वोत्तम होऊन बाहेर पडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक यांनी सतत प्रयत्न केले पाहिजे.

शाहू महाविद्यालयातील क्रीडाक्षेत्रातील आणि विविध विषयांमध्ये अव्वल क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयातील प्रा. राजेंद्र देठे, प्रा. पी. एच. कांबळे यांना 'बेस्ट टीचर' अवॉर्ड देण्यात आले; तर बी. एम. शिंदे, डी. डी. पाटील यांना बेस्ट कार्यालयीन सेवक अवॉर्ड प्रदान करण्यात आले. स्वागत, परिचय आणि प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांनी केले.

यावेळी एम. बी. शेख, प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील, माधवराव मोहिते, व्यंकाप्पा भोसले, विक्रांत पाटील, प्रा. डॉ. रमेश भेंडीगिरी, प्रा. गणेश लवंगारे यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

22 FEB 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सकाळ'तर्फे रंगणार 'ऊर्जा-संवाद ध्येयवेड्यांशी'

## तीन मार्चपासून आयोजन : फिझिंगा- संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत मुक्तसंवाद मालिका

संवाद ध्येयवेड्यांशी ऊर्जा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २१ : सकाळ माध्यम समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने तीन मार्चपासून सलग चार दिवस फिझिंगा - संजय घोडावत ग्रुप प्रस्तुत 'ऊर्जा - संवाद ध्येयवेड्यांशी' हा अनोखा कार्यक्रम रंगणार आहे. लोककला केंद्रात दररोज सायंकाळी सहा ते आठ या वेळेत यशोलौकिकाच्या शिलेदारांशी संवाद साधण्याची ही पर्वणी ठरणार आहे. दरम्यान, आपल्या आजवरच्या वाटचालीतील विविध अनुभवांची शिदोरी ही मंडळी या निमित्ताने सर्वांसमोर रिती करतीलच; त्याशिवाय प्रत्येकातील नवचेतना जागवताना आपापल्या क्षेत्रात नेटाने पुढे जाण्यासाठीची ऊर्जाही देतील.


श्रेयस तळपदे


शेखर नाईक


नीलिमा मिश्रा


राकेश देशमुख


राज कांबळे


संदीप पाटील


अमोल यादव

कार्यक्रमाला सर्वांसाठी विनामूल्य खुला प्रवेश असून सोमवार (ता. २६) पासून मोफत सन्मानिका 'सकाळ'च्या शिवाजी उद्यमनगरातील कार्यालयात उपलब्ध होणार आहेत.

'सकाळ'ने तीन वर्षांपूर्वी या अनोख्या उपक्रमाला प्रारंभ केला. बॉलिवूडचे प्रसिद्ध निर्माता, दिग्दर्शक आणि पटकथाकार सुभाष घई, प्रसिद्ध अभिनेता अतुल कुलकर्णी, प्रसिद्ध अभिनेता राहुल बोस, सयाजी शिंदे, भारत विकास ग्रुप - बीव्हीजी इंडिया लिमिटेडचे हणमंतराव गायकवाड, 'सुपर थर्टी'चे संस्थापक आणि गणितज्ज्ञ आनंद कुमार, ज्ञानेश्वर मुळे, प्रसिद्ध दिग्दर्शक मधुर भांडारकर, भारतातील पहिली वाईन उद्योजिका अचला जोशी, प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र पटेल, 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष यशवंतराव थोरात, कुशल संघटक प्रदीप लोखंडे, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, ग्लोबल वेलनेस ॲम्बॅसिडर रेखा चौधरी, दिग्दर्शक अभिनय देव, फ्लेम युनिव्हर्सिटीचे संस्थापक संचालक पराग शहा, 'व्हेंटिलेटर' चित्रपटाचे दिग्दर्शक राजेश मापुस्कर, दास ऑफशोअरचे अशोक खाडे, विशेष पोलिस महानिरीक्षक कृष्ण प्रकाश यांच्याशी दिलखुलास संवाद साधण्याची संधी मिळाली होती. यंदाही अशाच नामांकित वक्त्यांची प्रभावळ लाभली आहे. चला तर मग, आजच वेळेचे नियोजन करू या. तीन ते सहा मार्चची सायंकाळ नवप्रेरणादायी करू या...! अधिक माहितीसाठी सूरज जमादार (मोबाईल ९५५२५८१९१८) यांच्याशी संपर्क साधावा.

### असे होतील संवाद

- **३ मार्च : प्रसिद्ध अभिनेता श्रेयस तळपदे**
- **४ मार्च : पद्मश्री शेखर नाईक** (भारतीय अंध क्रिकेट संघाचे माजी कर्णधार), **नीलिमा मिश्रा** (रॅमन मॅगेसेसे पुरस्कार विजेत्या सामाजिक कार्यकर्त्या)
- **५ मार्च : राकेश देशमुख** (सॉफ्टवेअर क्षेत्रातील प्रसिद्ध तंत्रज्ञ), **राज कांबळे** (प्रसिद्ध जाहिरातकार).
- **६ मार्च : संदीप पाटील** (आयपीएस, सातारा), **कॅप्टन अमोल यादव** (पायलट व विमाननिर्मितीतील मराठी उद्योजक)

### शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य

**'ऊर्जा : संवाद ध्येयवेड्यांशी' या उपक्रमाला गेली चार वर्षे शिवाजी विद्यापीठाचे विशेष सहकार्य मिळाले आहे. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात दररोज सायंकाळी ६ ते रात्री ८ या वेळेत मुलाखती रंगतील. मोफत सन्मानिकेसह प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाईल. गर्दीच्या पार्श्वभूमीवर पार्किंगची नेटकी व्यवस्था असेल.**

### प्रायोजकांविषयी...

- **सहप्रायोजक : चाटे शिक्षण समूह, मार्व्हलस् इंजिनिअर्स प्रायव्हेट लिमिटेड, तनिष्क ज्वेलर्स, अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स, श्री ट्रॅव्हल्स**
- **हॉस्पिटॅलिटी पार्टनर : हॉटेल सयाजी**
- **रेडिओ पार्टनर : रेडिओ सिटी**

22 FEB 2018 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



## साहित्य भान

प्रा. रणधीर शिंदे

# मराठी राजभाषा दिन

२७ फेब्रुवारी हा कुसुमाग्रजांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. त्याप्रमाणे मराठी भाषेच्या उत्सवी कौतुकाचे सोहळे या आठवड्यातही साजरे होतील. 'जरी ती राजभाषा नसे' अशी एकेकाळी माधव ज्युलियन यांनी खंत व्यक्त केली होती.

मराठीचा प्राचीन वारसा ते आजतागायतचा प्रवास हा समृद्ध स्वरूपाचा आहे. तो केवळ वाङ्‌मयापुरता सीमित नाही, तर तो बोलण्यातूनही प्रकट झाला आहे. प्राकृत आविष्कारात मराठीचे पूर्वरूप शोधले गेले. यादव काळात ती राज्यव्यवहाराची भाषा बनली. मधल्या काळात ती फारसी बनली. पुढे भाषावार प्रांतरचनेनंतर भाषिक-भू समाजाना सीमांचे बंधन घालण्यात आले. कोट्यवधी ओव्या, अभंग, भारुडे व लोकभाषेतून मराठीचे प्रतिध्वनी निनादत आले.

भाषेचिन्हात इतिहास, परंपरा, संस्कृती, भूगोल दडलेला असतो. इतिहासक्रमात मराठीची अवस्था बदलत आली आहे. समाज ठेवण आणि घडणीशी भाषेचा नित्य संबंध असतो. या भाषादिनानिमित्ताने मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी ठोस असे काही होईल, अशा अपेक्षा बाळगायला हरकत नाही. भाषेचे संस्थात्मीकरण झाल्यानंतर तिच्या वाढीच्या शक्यता निर्माण होतात. राज्यव्यवहारापासून जीवनाच्या सर्व क्षेत्रांत भाषेचा अत्यंत चल क्षमतेने वापर, विनियोग व्हावा लागतो. त्यासाठी लागणारे भरणपोषण राज्यसंस्था, विद्यापीठे, ज्ञान निर्मितीची केंद्रे, अभ्यासकांकडून व्हावे लागते; मात्र तसे घडताना दिसत नाही.




मराठीच्या क्षमतांचा खूप विस्ताराने आणि प्रसरणशील वापर व्हायला हवा. मात्र, ज्ञाननिर्मिती व भाषाविनियोग यातील अंतर वाढत चालले आहे. यशवंतराव चव्हाण यांनी 'मराठी ही ज्ञानभाषा व्हावी' असे म्हटले होते. तसे घडत नाही. त्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ स्थापन करुन केवळ वाङ्‌मयच नव्हे, तर सामाजिक शास्त्रे व विज्ञान, तंत्रज्ञानविषयक ग्रंथांची निर्मिती ही मराठीतून व्हावी असा ध्यास होता; परंतु तो काही काळानंतर विरून गेला. कोल्हापूरचेच इतिहासकार व विज्ञानप्रसारक बाळाजी प्रभाकर मोडक यांनी १९०४ साली मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात दिलेल्या व्याख्यानात 'मराठी भाषेच्या विश्वविद्यालया'ची गरज प्रतिपादिली होती. ती अजूनही मूर्त झाली नाही. तसेच जुन्या काळात शं. गो. तुळपुळे यांनी मराठी भाषेचा तंजावरी कोश निर्माण केला. मारुती चित्तमपल्ली यांनी मृगपक्षीशास्त्र कोश मराठीत निर्माण केला. वसाहतकाळात ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मराठीची केलेली सेवाही तितकीच ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. मोल्सवर्थने अथक परिश्रम घेऊन निर्माण केलेला कोश हा मानदंड स्वरूपाचा आहे.

गेली तीन-चार वर्षे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी जोरदार प्रयत्न चालू आहेत. पूर्वी ग्रीक आणि लॅटिन भाषांना अभिजात मानले जायचे. भारतात मात्र भाषिक अस्मिता आणि निवडणुकांची गोळाबेरीज म्हणून एका टप्प्यावर अभिजात भाषेचे निश्चितीकरण केले. तामीळ भाषेस पहिल्यांदा हा मान मिळाला. नंतर त्यापाठोपाठ संस्कृत, तेलगू, कन्नड व मल्याळम् भाषेस अभिजाततेचा दर्जा मिळाला. त्या त्या भाषेला दीड ते अडीच हजार वर्षांचा इतिहास असायाला हवा. तसेच त्या भाषेची व वाङ्‌मयाची परंपरा ही प्राचीन व स्वतंत्र असायला हवी, असे निकष अभिजात भाषेत मानले. मराठीचा इतिहास हा आठ शतकांचा मानला गेला. तो भाषा इतिहासाची साधने अभ्यासकांनी तिथपर्यंतच शोधल्यामुळे. आता मात्र या समितीच्या अभ्यासकांनी मराठीचे पूर्वरूप दोन हजार वर्षांपूर्वीच्या 'गाहासत्तसई' ग्रंथापर्यंत शोधली आहेत. लिखित भाषेपूर्वीच्या बोलण्याच्या खुणांचा माग घेणेही तितकेच महत्त्वाचे ठरेल. वर्तमानात स्वभाषेचे अतिरेकी प्रेम आणि परभाषेचा दुःस्वास टाळून मराठीच्या क्षमता अधिकाधिक विस्तारित करायला हव्यात. त्यामुळे राजभाषा दिनाच्या निमित्ताने मराठी भाषेच्या संवर्धन व वाढीसाठी अधिकाधिक मूलभूत स्वरूपाचे कार्य व्हायला हवे. अनेकविध भाषेतील भाषांतरे भविष्यकाळाची गती लक्षात घेता तंत्रज्ञानाशी समांतर वाहणारी भाषा कशी सक्षम होईल, याचा ध्यास कोणाही जागरुक भाषाप्रेमीला असायला हवा.

(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्राध्यापक आहेत.)
kollokmatpratisad@gmail.com

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 FEB 2018
सकाळ

# करिअर 'मोडी'तील!

इतिहास लेखन, संशोधन व ऐतिहासिक कागदपत्रांच्या अभ्यासासाठी मोडीचा अभ्यास उपयुक्त आहेच. याशिवाय ज्यांना इतिहास विषयात आवड आहे, ते यात करिअरही करू शकतात. मोडीत करिअर म्हटल्यावर अनेकांना आश्चर्य वाटेल; पण खरेच मोडी अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर अनेकविध संधीची कवाडे उघडतात. यात नोकरी आणि स्वतंत्र व्यवसाय असे २ पर्याय असून स्वतंत्र व्यवसायाचा पर्याय नोकरी वा मुख्य व्यवसाय सांभाळून जोड म्हणूनही करता येतो.

शासकीय कार्यालयात जुन्या कागदपत्रांची माहिती करून घेण्यासाठी मोडी पंडित वा सहाय्यक संशोधक म्हणून काम करण्याची संधी मिळू शकते. अनेक ठिकाणच्या शासकीय ग्रंथालयात मोडीतील कागदपत्रे व हस्तलिखिते जतन केलेली असतात. तेथेही मोडी पंडित वा लिप्यांतरकाराची गरज असते. मोडीचा अभ्यासक्रम पूर्ण झाला असल्यास येथील नोकरीसाठी अर्ज करता येतो. केंद्र सरकारच्या विविध संस्थांचे मोडी व हस्तलिखितांबाबत विशिष्ट कालावधीचे अनेक प्रकल्प असतात. देशभरातील



विद्यापीठ व शासकीय ग्रंथालयांवर त्या त्या प्रकल्पांच्या संशोधनाची व समन्वयाची जबाबदारी असते. त्यात प्रकल्प संशोधक म्हणून सहभागी झाल्यास कामाच्या समाधानाबरोबरच चांगली कमाईही करू शकता.

अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर अनेकजण मोडीचे क्लास घेतात. ते चालतातही चांगले. इतिहास विषयात बी.ए. वा एम.ए. झाले असल्यास आणि या जोडीला वस्तुसंग्रहालयशास्त्राचा अभ्यासक्रम झाला असेल तर पर्यटन मार्गदर्शक म्हणूनही स्वतंत्र व्यवसाय करता येतो. अगदी हेरिटॉज वॉकचे आयोजन करूनही चांगले अर्थार्जन करू शकता; मात्र याला पूरक म्हणून मोडी अभ्यासक्रम पूर्ण करायलाच हवा. इतिहासाची परिपूर्ण माहिती देण्यासाठीही मोडीचे ज्ञान आवश्यक आहे. मोडीतील एखादा विषय घेऊन पीएचडी करता येते. सेट, नेट, एम.फिल., पीएच.डी. अशी शैक्षणिक पात्रता घेऊन प्राध्यापकपदाच्या मुलाखतीस जाताना मोडी अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र तुमचे अतिरिक्त शिक्षण ठरेल, यात शंका नाही.

## अभ्यासक्रम कुठे?

शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे वर्षातून दोन वेळा १२ दिवसीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेतला जातो. ऑगस्ट-सप्टेंबरला गणपती, दसरा सणाच्या मध्ये पहिला आणि जानेवारी-फेब्रुवारीच्या दरम्यान दुसरा अभ्यासक्रम घेतला जातो. लिहिता व वाचता येणारी कोणतीही व्यक्ती अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकते. दुसऱ्या टप्प्यातील अभ्यासक्रम सध्या सुरू आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याचा मानस आहे. इच्छुकांनी केंद्राशी संपर्क साधावा.

**– प्रा. डॉ. नीलांबरी जगताप,**
समन्वयक, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र.
neelambarijagtap@gmail.com

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2018
लोकमत

# विद्यापीठात आज चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट आणि राज्यशास्त्र विभागातर्फे आज, गुरुवारी चर्चासत्र होणार आहे. 'निवडणुकांतील आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे' असा या चर्चासत्राचा विषय आहे. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहातील या चर्चासत्रात विविध तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.

22 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

## आज राज्यशास्त्र महोत्सव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालयांतील राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसाठी गुरुवारी (ता.२२) राज्यशास्त्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. स्पर्धेसाठी महाविद्यालयांतील दहा विद्यार्थी व दहा विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 FEB 2018

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षेत कोरे इंजिनिअरिंग अव्वल

प्रतिनिधी
वारणानगर

मे २०१७ मध्ये झालेल्या शिवाजी विद्यापीठ परीक्षेत तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकीच्या, सिव्हिल विभागात ०५, केमिकल ०३, इलेक्ट्रॉनिक्स ०२, मेकॅनिकल ०१, बायोटेक ०१, इंफोर्मेशन टेक्नोलॉजी ०१ अशा एकूण १३ विद्यार्थी विद्यापीठ गुणवत्ता यादीत झळकले.

या परीक्षेत सिव्हिल विभागाचा स्वप्नील भगत हा ८२.५६ टक्के गुण मिळवून प्रथम तर याच विभागातील शरयू जोशी (८०.३८ टक्के) द्वितीय, योगेश कदम (७८.८८ टक्के) व शिवानी तांबडे (७८.८८ टक्के) यांनी सातवा तर स्नेहल पाटील (७८.०९ टक्के) हिने दहावा क्रमांक मिळवला. केमिकल विभागात, सुमीत ऐतवडे ने (८१.४४ टक्के) तृतीय, शार्दुलकुमार शिंदे (७७.८१ टक्के) सहावा तर अभिषेक पाठक (७६.०६ टक्के) ने नववा क्रमांक पटकावला. इलेक्ट्रॉनिक्समध्ये, प्रियांका कुंभार (८०.१९ टक्के) हिने दुसरा तर अनिल बंडगर (७९.१३ टक्के) ने पाचवा रँक मिळवला. जोशी प्राजक्ता (७६.३१ टक्के) हिने मेकॅनिकल विभागातून आठवा, इनामदार अप्पालाल (७५.८७ टक्के) याने बायोटेकमध्ये नववा तर ओंकार वनारसे (७९.७८ टक्के) याने इंफोर्मेशन टेक्नोलॉजी विभागातून विद्यापीठात दुसरा क्रमांक मिळवला.

**१३ विद्यार्थी गुणवत्ता यादीत**

विद्यापीठ गुणवत्ता यादीत झळकलेल्या गुणवंताबद्दल प्राचार्य, डॉ. एस.व्ही.आणेकर यांनी समाधान व्यक्त केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा डॉ. विनय कोरे यांनी सत्कार केला. पॉलिटेक्नीकचे प्राचार्य, प्रा. बी .व्ही. बिराजदार, प्रा. एल. बी .पटकुरे, प्रा. एस. ए. देसाई, प्रा. डी. जी. चौगुले, प्रा. एन. एस.हनमापुरे, प्रा. ए. जी. पाटील आदींचे मार्गदर्शन लाभले.